पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.११

सभावृत्तांत

दिनांक १८/०१/२०१४ वेळ सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची विशेष सभा शनिवार दि. १८/०१/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता ड प्रभागाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सोनाली जम | अध्यक्ष, |
| २. | मा.विनोद नढे | सदस्य |
| ३ | मा.कैलासभाऊ थोपटे | सदस्य |
| ४. | मा.विलासराव नांदगुडे | सदस्य |
| ५. | मा..रामदास बोकड | सदस्य |
| ६. | मा.राजेंद्र जगताप | सदस्य |
| ७. | मा.अतुल शितोळे | सदस्य |
| ८. | मा.उषा वाघेरे | सदस्या |
| ९. | मा.विमल काळे | सदस्या |
| १०. | मा.निता पाडाळे | सदस्या |
| ११. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| १२. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| १३. | मा.माया बारणे | सदस्या |
| १४. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| १५. | मा. शितल काटे | सदस्या |
| १६ | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| १७ | मा.शकुंतला धराडे | सदस्या |
| १८. | मा. शैलजा शितोळे | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, सभा शाखा, श्री.संदेश चव्हाण , कार्यकारी अभियंता, .मा.रामनाथ टकले उपअभियंता, स्थापत्य, मा.विजय ओव्हाळ, उपअभियंता मा.राजेंद्र जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.पांडुरंग केदारी उपअभियंता, विदयुत, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता , विदयुत, इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

ठराव क्रमांक :५४ विषय क्रमांक : ०१

दिनांक : १८/०१/२०१४ विभाग :-, ड प्रभाग

सुचक : मा.वैशाली जवळकर अनुमोदक : मा.विमल काळे

संदर्भ : मा.प्रभाग अध्यक्ष, ड प्रभाग यांचेकडील पत्र दि. १३/०१/२०१४

महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम २९–अ (१) अन्वये १२ लाख लोकसंख्येपर्यंत ०४ प्रभाग समित्या आणि १२ लाख लोकसंख्येच्या पुढे अतिरीक्त ०३ लाख लोकसंख्येकरीता एक या प्रमाणे प्रभाग समित्यांची रचना करण्याची तरतुद आहे. त्याकरीता महानगरपालिकेची सध्याची लोकसंख्या विचारात घेऊन पूर्वीच्या अ,ब,क,ड या ०४ प्रभाग समित्यां व्यतिरिक्त नव्याने ०२ प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम २९ – अ (१) मध्ये प्रत्येक शहरात महानगरपालिका ठरवील अशा लागून असलेल्या निवडणूक प्रभागांचा समावेश असलेल्या प्रभाग समित्यांची रचना करण्यात येईल असे नमुद आहे. त्यानुसार प्रभाग समित्यांची रचना करण्याचे अधिकार मा. महापालिका सभेला आहेत. त्यानुसार मा.महापालिका सभेने ठराव क्र. ३५१ दि. १९/०८/२०१३. अन्वये महानगरपालिकेच्या अस्तित्वात असलेल्या पुर्वीच्या ०४ प्रभाग समित्यांऐवजी खालील नमुद केल्याप्रमाणे एकूण ०६ प्रभाग समित्यांची त्यांचे कार्यक्षेत्रात समाविष्ट होत असलेले प्रभाग व प्रस्तावित क्षेत्रिय कार्यालयांची ठिकाणे यांसह पुनर्रचना करण्यास मान्यता दिली आहे.

पुनर्रचनेबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | प्रस्तावित कार्यालय |
|---|---|---|---|
| **१.** | **अ क्षेत्रीय कार्यालय** | **८,१०,१४,१५,१६,१७, १८,१९,२५,२६,२७ = ११** | **भेळ चौक, प्राधिकरण, निगडी, पुणे ४४.** |
| **२.** | **ब क्षेत्रीय कार्यालय** | **२०,२१,२२,२३,२४,४२,४९,५० ,५१,५२,५३ = ११** | **एल्प्रो कंपनी आवार लिंकारोड चिंचवड, पुणे ३३.** |
| **३.** | **क क्षेत्रीय कार्यालय** | **३७,३८,३९,४०,४१,५८,५९,६० ,६१,६२,६३,६४ = १२** | **हॉकी स्टेडीयम शेजारी, नेहरुनगर भोसरी, पुणे ३९.** |
| **४.** | **ड क्षेत्रीय कार्यालय** | **४३,४४,४५,४६,४७,४८, ५४,५५,५६, ५७, = १०** | **औंध रावेत रस्ता, रहाटणी, पुणे १७.** |
| **५.** | **इ क्षेत्रीय कार्यालय** | **६,७,२९,३०,३१,३२,३३,३४, ३५,३६, = १०** | **पांजरपोळ समोर, पुणे नाशिक रस्ता, भोसरी, पुणे ३९** |
| **६.** | **फ क्षेत्रीय कार्यालय** | **१,२,३,४,५,९,११,१२,१३,२८= १०** | **प्राधिकरणाचे जुने कार्यालय, टिळक चौक, निगडी पुणे ४४** |

त्यानुसार महापालिकेच्या अ,ब,क,ड,इ आणि फ या प्रमाणे समित्यांची पुनर्रचना करुन नविन क्षेत्रीय कार्यालये अस्तित्वात येणे कामी मा.महापालिका सभेने ठराव क्र. ३५१ दि. १९/०८/२०१३ अन्वये मान्यता दिल्यानूसार पूर्वीचे ड प्रभाग समिती कार्यक्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या उक्त ठरावात नमुद काही प्रभाग वगळून इतर प्रभाग समितीच्या कार्यक्षेत्रात समाविष्ठ केल्याने अथवा पुनर्रचनेनुसार इतर प्रभागातील काही प्रभाग नव्याने समाविष्ट करुन पुनर्रचित ड प्रभाग समिती अस्तित्वात आलेली असल्याने त्याकरीता क्षेत्रिय कार्यालय प्रत्यक्ष कार्यान्वित करणेकरीता आवश्यक त्या सांविधिक बाबींची/प्रक्रीयांची पूर्तता करुन प्रत्यक्ष कामकाज सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावानुसार कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/
( सोनाली जम)
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
पिंपरी - ४११ ०१८

क्रमांक – ड/सभा/कावि/४३ /२०१४
दिनांक – १८ /०१/२०१४

सही/
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.